फियर्दि

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** इस्लामपूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0363 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**23/09/2026 02:00

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 22/09/2026

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/09/2026

**Time From (वेळेपासून):** 13:05 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/09/2026 **Time (वेळ):** 02:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/09/2026 03:03 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

नैऋत्य, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मध्यवर्ती प्रशासकीय इमारत तिसर, मजल्ल्यावरील उप अधिक्षक भुमी अ,कार्यालय वाळवा मु ईश्वरपुर ये

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): यास्मीन शरिफ इनामदार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1985

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधीक्षक,अन्टी करप्शन ब्युरो, सांगली,इस्लामपूर,सांगली, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधीक्षक,अन्टी करप्शन ब्युरो, सांगली,इस्लामपूर,सांगली, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9404041064

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सोनाली सचिन आवटी | | | 1. सावर्डे गल्ली, कदम वेस, आष्टा,, आष्टा, तावाळवा,इस्लामपूर, सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सुनिल गणपती पाटील | | | 1. पोकले काटा, मुपो कोडोली, ,ता पन्हाळा, ,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब दि. 23.09.2026

मी श्रीमती यास्मीन इनामदार, वय - 40 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.नं 9527904700.
सरकारतर्फे फिर्यादी होवून देते फिर्यादी जबाब की, मी पोलीस उप अधीक्षक या पदावर अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.

दि. 18/08/2026 रोजी तक्रारदार श्री. अलिअकबर नुरुद्दीन मुल्ला, रा. करंजवडे, ता. वाळवा जि.सांगली यांनी आम्हास संपर्क करून त्यांची श्रीमती सोनाली आवटी, परिरक्षण भुमापक व श्री. सुनिल पाटील, मुख्यालय सहाय्यक, भुमी अभिलेख कार्यालय वाळवा यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार कळवून त्यांची तक्रार ईश्वरपूर येथे येवून घेण्याची विनंती केली. त्यावेळी मी तक्रारदार यांना दि.19.08.2026 रोजी सकाळी 11.00 वाजता पथकासह ईश्वरपूर येथे येत असलेचे सांगून आलेनंतर संपर्क करीत असलेचे सुचना दिल्या.

त्यानंतर मी लागलीच मा. उपप्रादेशिक मोटार परिवहन विभाग सांगली यांना पत्रव्यवहार करून वर्ग-3 चे दोन कर्मचारी यांची पंच सेवा मिळणेबाबत विनंती करून दोन्ही पंचांचे संपर्क क्रमांक प्राप्त करून त्यांना तात्काळ एसीबी कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या.
दि.19/08/2026 रोजी मी दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच 09.30 वा चे सुमारास एसीबी कार्यालयात आमचे समक्ष हजर झाले. त्यांनी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोह/सलिम मकानदार, पोना/चौगुले, चालक रजपूत असे पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे आवश्यक साहित्य सह शासकीय वाहन महिंद्रा बुलेरो न्युओ क्र. एमएच-10-ईव्ही-4685 मधून कार्यालयातून 09.45 वा चे सुमारास रवाना होवून स्टेशन चौक, सांगलीवाडी, आष्टा, ईश्वरपूर, वाघवाडी फाटा, येथे 10.50 वा चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर मी तक्रारदार मुल्ला यांना संपर्क करून आम्ही थांबलो त्याठिकाणी बोलवून घेतले. तक्रारदार श्री. मुल्ला हे त्यांचेकडील होंडा शाईन क्र. एमएच-10-ईसी-6232 वरून आमचे समक्ष हजर झालेनंतर त्यांना मी आमचेकडील वाहनात बसवले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. मुल्ला यांची दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची एकमेकात ओळख करुन दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री. केदार जनार्दन महाडीक यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री.वैभव वसंतराव पाटील यांनी पंच नं.2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.

त्यानंतर तक्रारदार श्री. मुल्ला यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये तक्रारदार यांचे करंजवडे येथील सिटी सर्वे नं.515 मधील क्षेत्राची मोजणी करून प्रॉपटी कार्ड मधील क्षेत्र दुरूस्तीची नोंद घालणेसाठी श्रीमती सोनाली आवटी, परिरक्षण भुमापक व श्री. सुनिल पाटील, मुख्यालय सहाय्यक, भुमी अभिलेख कार्यालय वाळवा यांनी तक्रारदार यांचेकडे 50,000/- रूपये लाचेची मागणी केली असलेबाबत हकीकत सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. मुल्ला यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. मुल्ला यांनी त्यांचा हस्तलिखीत लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला. त्यावेळी मी सदर तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. मुल्ला यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगितलेली

तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याचे असल्याची खात्री करून तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.
त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करुन लोकसेवक श्रीमती सोनाली आवटी, परिरक्षण भुमापक व श्री. सुनिल पाटील, मुख्यालय सहाय्यक, भुमी अभिलेख कार्यालय वाळवा यांचेविरूध्द लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.
त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. मुल्ला व पंच क्र.1 महाडीक यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी 11.39 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंच नं.1 यांना पडताळणीकामी दिले सुचनांची उजळणी करून दिली.
त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 11.53 वा सुरु करुन तो तक्रारदार यांचे गळयामध्ये अडकवून त्यांना लोकसेवक श्रीमती सोनाली आवटी, परिरक्षण भुमापक व श्री. सुनिल पाटील, मुख्यालय सहाय्यक यांची भुमी अभिलेख कार्यालय वाळवा ईश्वरपूर येथे भेट घेण्यास रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार मुल्ला व पंच नं.1 महाडीक होंडा शाईन क्र. एमएच-10-ईसी-6232 वरून रवाना झाले.
त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. मुल्ला व पंच नं.1 महाडीक असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 14.17 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला. त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. महाडीक यांना, लोकसेवक श्रीमती सोनाली आवटी व श्री. सुनिल पाटील, यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, " आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून मध्यवर्ती प्रशासकीय इमारत ईश्वरपूर येथील दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार व मी असे मो.सा. पार्क करून प्रशासकीय कार्यालयाचे 3 -या मजल्यावरील भुमी अभिलेख कार्यालय येथे दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार यांनी कार्यालयातील कर्मचारी यांना आवटी मॅडम यांचेबाबत विचारणी केली त्यावेळी त्यांनी आवटी मॅडम आले असल्याचे सांगून त्यांना फोन करण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी आवटी मॅडम यांना फोन केला असता मॅडम यांनी फोन उचचला नाही. त्यानंतर तक्रारदार व मी असे काही वेळ आवटी मॅडम यांची येण्याची वाट बघीतली. काही वेळानंतर तक्रारदार यांनी आवटी मॅडम यांची भेट घेवून त्यांचेशी कामा संदर्भात चर्चा केली. त्यावेळी आवटी मॅडम यांनी तक्रारदार यांना कामात असलेचे सांगितले.
त्यावेळी आवटी मॅडम हया कामात असल्याने तक्रारदार व मी असे तेथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. मुल्ला यांना पडताळणीची हकीकत विचारली असता तक्रारदार यांनी आवटी मॅडम हया कामात असल्याने त्यांचेशी बोलणे झाले नसल्याची हकीकत सांगितली.
त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. मुल्ला व लोकसेविका श्रीमती सोनाली आवटी यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 002 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.
पडताळणी कारवाईमध्ये, लोकसेविका श्रीमती सोनाली आवटी हया कामामध्ये व्यस्त असल्याने तक्रारदार व त्यांचेमध्ये बोलणे झाले नसल्याचे निष्पन्न झाले.
त्यानंतर आम्ही सर्वानुमते तक्रारदार व पंच नं.1 यांना पुन्हा पडताळणीकामी लोकसेविका श्रीमती सोनाली आवटी व श्री. सुनिल पाटील यांचेकडे पाठवून त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले.
त्यानंतर मी तक्रारदार व पंच नं.1 यांना पडताळणीकामी दिले सुचनांची उजळणी करून दिली.
त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 14.44 वा सुरु करुन तो तक्रारदार यांचे गळयामध्ये अडकवून त्यांना लोकसेवक श्रीमती सोनाली आवटी, परिरक्षण भुमापक व श्री. सुनिल पाटील, मुख्यालय सहाय्यक यांची भुमी अभिलेख कार्यालय वाळवा ईश्वरपूर येथे भेट घेण्यास रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार मुल्ला व पंच नं.1 महाडीक होंडा शाईन क्र. एमएच-10-ईसी-6232 वरून रवाना झाले.
त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. मुल्ला व पंच नं.1 महाडीक असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 15.51 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला.
त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. महाडीक यांना, लोकसेवक श्रीमती सोनाली आवटी व श्री. सुनिल पाटील, यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की,

" आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून मध्यवर्ती प्रशासकीय इमारत ईश्वरपूर येथील दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार व मी असे मो.सा. पार्क करून प्रशासकीय कार्यालयाचे 3 -या मजल्यावरील भुमी अभिलेख कार्यालय येथे दाखल झालो.

त्यावेळी तक्रारदार यांनी आवटी मॅडम व सुनिल पाटील यांची भेट घेवून त्यांचेशी त्यांनी दिलेल्या अर्जाबाबत व प्रॉपर्टी कार्ड संदर्भात चर्चा करू लागले. त्यावेळी सुनिल पाटील यांनी तक्रारदार यांना पुन्हा एक नविन अर्ज देण्यास सांगून मोजणीची तारीख घेण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी हा असे म्हणाले. त्यावेळी सुनिल पाटील यांनी तक्रारदार यांना "फक्त बाकीच तुमच तुम्ही काय हे हाय तुम्ही आपले व्यवस्थीत हे करून" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "चालेल पण साधारणता किती कस काय सांगा" असे म्हणाले असता सुनिल पाटील यांनी "जुन्या सांगितलेत त्या आणी एक पाच दहा हजार वाढ करा" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "किती पण?" असे विचारले असता सुनिल पाटील यांनी आवटी मॅडम यांना "ओ मॅडम काय सांगितलय" असे म्हणून "हे मॅडम त्यांच्या रिस्कवर करणार आहेत....... एक सांगितलेल" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "एक लाख" असे विचारले असता सुनिल पाटील यांनी "त्यात काय तर हिकड तिकड कमी जास्त करून टाका" असे म्हणून तक्रारदार यांचेकडे 1,00,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी "एक लाख म्हणजे लई होतय सर" असे म्हणाले. त्यावर सुनिल पाटील यांनी तक्रारदार व आवटी मॅडम यांना "ते ह्यानाच करून टाका.... बघा ठरवा तुमच्या बेतान....बघा विचारून मॅडमना.... विचारून घ्या आणि सांगा....विचारून सांगत्यात तुम्हाला विचारून घेवू देत" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी आवटी मॅडम यांना "हितल्या हित होईल तेवढ मिटवून द्या" असे म्हणाले. त्यावर आवटी मॅडम यांनी तक्रारदार यांना "बघते मॅडमशी बोलून" असे म्हणाले. त्यावर सुनिल पाटील यांनी तक्रारदार यांना "करून देतील लगेच....फक्त जरास तुमच्याकडच व्यवस्थीत हे झाले म्हणजे बास झाल" असे म्हणाले.

त्यानंतर आवटी मॅडम यांनी तक्रारदार यांना मॅडम (उप अधीक्षक) हया जेवण्यास गेले असल्याचे सांगून "किती जमल तुम्ही सांगा... तस सांगता येईल.... तुम्हाला जेवढ शक्य हाय तुम्ही सांगीतला तर...मला सांगता येईल" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "जुना आकडा तर तुम्हाला माहितच हाय की आता" असे म्हणाले. त्यावर आवटी मॅडम यांनी "पन्नास" असे विचारले असता तक्रारदार यांनी "पन्नास हजार ना" असे म्हणाले. त्यावर आवटी मॅडम यांनी "हा.....ठिक हाय... मी बोलते, मी तस मॅडमला.." असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी दुसरे कुठले चार्जेस परत लागणार का व त्याची रिसीट मिळणार का? याबाबत विचारले असता आवटी मॅडम यांनी दुसरे कोणते चार्जेस लागत नसून त्याची रिसीट मिळत नसल्याचे सागून "तुम्ही दिला तर प्रोसेसन पुढ जाईल ना तिकड मॅडमच्या हिथन" असे म्हणाले.

त्यानंतर आवटी मॅडम यांनी तक्रारदार यांना नविन अर्ज देण्यास सांगितला त्याप्रमाणे तक्रारदार यांनी दि. 19.08.2026 रोजीचा नविन अर्ज व त्यासोबत कागदपत्रे आवटी यांचेकडे दिली. त्यावेळी तक्रारदार यांनी आवटी मॅडम यांना "मॅडम म्हणजे हया उप अधीक्षक मॅडम सुजाता माळी" असे विचारले असता आवटी मॅडम यांनी "हा" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी "बर.. येवू मॅडम...सुनिल सर येतो...बघा जरा" असे म्हणून तक्रारदार व मी तेथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो. लोकसेवक सुनिल पाटील व आवटी मॅडम यांनी तक्रारदार यांचेकडे माझे समक्ष लाच मागणी केली आहे. मी थोडया अंतरावर थांबून त्यांचे हावभाव व इशारे पाहून व त्यांचे बोलणे ऐकले आहे." वगैरे हकीकत पंच नं.1 महाडीक यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. मुल्ला यांना पडताळणीची हकीकत विचारली असता तक्रारदार यांनी लोकसेवक सुनिल पाटील व आवटी मॅडम यांनी माझ्याकडे लाच मागणी केली त्यावेळी पंच क्र.1 महाडीक हे ऐकू येईल इतक्या अंतरावर हजर होते व त्यांनी आमचेतील बोलणे ऐकले व पाहिले आहे अशी हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. मुल्ला व लोकसेवक सुनिल पाटील व आवटी मॅडम यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 003 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाईमध्ये, लोकसेवक सुनिल पाटील यांनी तक्रारदार यांचे प्रॉपर्टी कार्डवरील क्षेत्र दुरस्तीचे काम करून देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे 1,00,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. तसेच आवटी मॅडम यांनी देखील लोकसेवक सुनिल पाटील व तक्रारदार यांचे चर्चेमध्ये सहभाग घेवून तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती 50,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीबाबत उप अधीक्षक भुमी अभिलेख मॅडम यांना रक्कमेबाबत विचारून कळवित असल्याचे सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते लोकसेवक सुनिल पाटील व सोनाली आवटी यांचे लाच मागणी कृत्यामध्ये उप अधीक्षक

सुजाता माळी यांचा सहभाग निश्चित करण्यासाठी त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर आम्ही सर्वानुमते लोकसेविका आवटी यांचा तक्रारदार यांना निरोप आल्यानंतर त्यांचेकडे व उप अधीक्षक सुजाता माळी यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार यांना लोकसेविका आवटी यांनी संपर्क केल्यास तात्काळ आम्हास संपर्क करणेच्या तसेच झाले कार्यवाहीबाबत गोपनीयता राखणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे निघून गेले.
त्यानंतर आम्ही दि.19.08.2026 रोजीची पडताळणी कारवाई बाबतचा सविस्तर पंचानामा व स्क्रिप्ट त्याच दिवशी दोन्ही पंचासमक्ष एसीबी कार्यालय, सांगली येथे पुर्ण करण्यात आला. व दि. 19.08.2026 रोजी वापरण्यात आलेले मेमरीकार्ड दोन्ही पंचांसमक्ष सिलबंद करण्यात आले आहे. तसेच मी दोन्ही पंचांना संपर्क केलेनंतर हजर राहणेच्या सुचना दिल्या.

दि. 01.09.2026 रोजी आम्ही तक्रारदार मुल्ला यांना संपर्क करून लोकसेविका आवटी यांचा काही संपर्क झाला आहे काय? याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी आवटी मॅडम यांचा फोन आला नसल्याचे सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना दि.02.09.2026 रोजी त्यांचे प्रलंबित कामाची माहिती घेण्यासाठी तसेच आवटी मॅडम व सुजाता माळी मॅडम यांचेमध्ये चर्चा झाली आहे अगर कसे? याची माहिती घेण्याकरीता पडताळणी करण्याचे निश्चित केले. मी तक्रारदार यांना दि.02.09.2026 रोजी सकाळी 11.00 वाजता वाघवाडी फाटा ईश्वरपूर येथे हजर राहणेच्या सुचना दिला. तसेच दोन्ही पंचांना संपर्क करून दि.02.09.2026 रोजी सकाळी 09.30 वाजता एसीबी कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या.

दि.02.09.2026 रोजी आम्ही कार्यालयात हजर असताना दोन्ही पंच 09.30 वा चे सुमारास आमचे समक्ष हजर झाले. त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोह/सलिम मकानदार, पोना/चौगुले, चालक रजपूत असे पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे आवश्यक साहित्य सह शासकीय वाहन महिंद्रा बुलेरो न्युओ क्र. एमएच-10-ईव्ही-4685 मधून कार्यालयातून 09.35 वा चे सुमारास रवाना होवून स्टेशन चौक, सांगलीवाडी, आष्टा, ईश्वरपूर, वाघवाडी फाटा, येथे 10.40 वा चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर मी तक्रारदार मुल्ला यांना संपर्क करून आम्ही थांबलो त्याठिकाणी बोलवून घेतले. तक्रारदार श्री. मुल्ला हे त्यांचेकडील होंडा शाईन क्र. एमएच-10-ईसी-6232 वरून आमचे समक्ष हजर झालेनंतर त्यांनी मी आमचेकडील वाहनात बसवले.
त्यानंतर आम्ही सर्वानुमते तक्रारदार व पंच नं.1 महाडीक यांना लोकसेविका आवटी व उप अधीक्षक सुजाता माळी यांचेकडे पाठवून त्यांची पडताळणी करण्याचे निश्चित केले.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. मुल्ला व पंच क्र.1 महाडीक यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.
त्यानंतर मी 11.26 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंच नं.1 यांना पडताळणीकामी दिले सुचनांची उजळणी करून दिली.
त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 11.45 वा सुरु करुन तो तक्रारदार यांचे गळयामध्ये अडकवून त्यांना लोकसेवक श्रीमती सोनाली आवटी, परिरक्षण भुमापक यांची भुमी अभिलेख कार्यालय वाळवा ईश्वरपूर येथे भेट घेण्यास रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार मुल्ला व पंच नं.1 महाडीक होंडा शाईन क्र. एमएच-10-ईसी-6232 वरून रवाना झाले.
त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. मुल्ला व पंच नं.1 महाडीक असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 12.09 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला.
त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. महाडीक यांना, लोकसेवक श्रीमती सोनाली आवटी यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, " आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून मध्यवर्ती प्रशासकीय इमारत ईश्वरपूर येथील दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार व मी असे मो.सा. पार्क करून कार्यालयाचे पोर्चजवळ गेलो. त्यावेळी पोर्चमध्ये आवटी मॅडम यांची भेट झाली. त्यावेळी आवटी मॅडम यांनी तक्रारदार यांना "आलात बर झाल... बोलले मॅडमशी.. माझ्याशी झालय बोलण.... तुम्ही पहिला सांगितला.... तेवढयाला स्टीकप हाय ना" असे विचारले असता तक्रारदार यांनी "पहिले म्हणजे" असे विचारले. त्यावर आवटी मॅडम यांनी तक्रारदार यांना " त्यावेळी बोलला होता तुम्ही....मॅडमनी एक म्हणले होते..... पण तुम्ही पन्नास पर्यंत मी देतो..." असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "हाय...तुमची चर्चा झाली" असे विचारले असता आवटी मॅडम यांनी "स्टीकप हाय ना?" असे विचारले असता तक्रारदार यांनी "चालेल मला" असे म्हणाले. त्यावर आवटी मॅडम यांनी तक्रारदार यांना त्यांचे

कामा संदर्भात मॅडमशी बोलणे झाले असल्याचे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी आवटी मॅडम यांना पैसे कधी देवू याबाबत विचारणा केली असता आवटी मॅडम यांनी तक्रारदार यांना "तुमच आधी काम तर होवू दे....काम झाल्यावर... आत्ता काय नको....बघु आपण" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "काम कधी होईल" असे विचारले असता "काम झाल्यावर कळवित असल्याचे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी आवटी मॅडम यांना काम झालेवर कॉल करणेस सांगून तक्रारदार व मी असे तेथून निघून आपणासमक्ष हजर झालो. लोकसेविका आवटी मॅडम यांनी तक्रारदार यांचेकडे माझे समक्ष लाच मागणी केली आहे. मी थोडया अंतरावर थांबून त्यांचे हावभाव व इशारे पाहून व त्यांचे बोलणे ऐकले आहे." वगैरे हकीकत पंच नं.1 महाडीक यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. मुल्ला यांना पडताळणीची हकीकत विचारली असता तक्रारदार यांनी आवटी मॅडम यांनी माझ्याकडे लाच मागणी केली त्यावेळी पंच क्र.1 महाडीक हे ऐकू येईल इतक्या अंतरावर हजर होते व त्यांनी आमचेतील बोलणे ऐकले व पाहिले आहे अशी हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. मुल्ला व लोकसेविका आवटी मॅडम यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 002 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाईमध्ये, कार्यालय प्रमुख श्रीमती सुजता माळी उप अधीक्षक यांचेशी चर्चा करून लोकसेविका सोनाली आवटी यांनी तक्रारदार यांचे प्रॉपर्टी कार्डवरील क्षेत्र दुरस्तीचे काम करून देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे 50,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे व काम झाल्यावर बघू असे म्हणून काम झाल्यानंतर लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

परंतू तक्रारदार श्री. मुल्ला यांनी लोकसेविका सुजाता माळी, उप अधीक्षक भुमी अभीलेख यांची भेट न घेताच परत आलेने तक्रारदार व पंच नं.1 यांना सुजाता माळी, उप अधीक्षक भुमी अभिलेख यांचेकडे पाठवून त्यांची पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. मुल्ला व पंच क्र.1 महाडीक यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 12.37 वा सुरु करुन तो तक्रारदार यांचे गळयामध्ये अडकवून त्यांना लोकसेविका सुजाता माळी यांची यांची भुमी अभिलेख कार्यालय वाळवा ईश्वरपूर येथे भेट घेण्यास रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार मुल्ला व पंच नं.1 महाडीक होंडा शाईन क्र. एमएच-10-ईसी-6232 वरून रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. मुल्ला व पंच नं.1 महाडीक असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 13.05 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला.

त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. महाडीक याना, लोकसेविका सुजाता माळी, भुमी उप अधीक्षक यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, " आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून मध्यवर्ती प्रशासकीय इमारत ईश्वरपूर येथील दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार व मी असे मो.सा. पार्क करून कार्यालयाचे 3 -या मजल्यावरील भुमी अभिलेख कार्यालय येथे दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार यांनी कार्यालयातील एका अनोळखी महिला कर्मचारी यांना माळी मॅडम यांचेबाबत विचारणा केली असता माळी मॅडम हया कोर्टात गेल्या असल्याचे समजले. त्यानंतर तक्रारदार व मी असे तेथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. मुल्ला यांना पडताळणीची हकीकत त्यांनी माळी मॅडम यांची भेट झाली नसल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. मुल्ला व अनोळखी महिला कर्मचारी यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 003 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाईमध्ये, लोकसेविका सुजाता माळी, उप अधीक्षक भुमी अभिलेख हया कार्यालयामध्ये हजर नसल्याने तक्रारदार यांची भेट झाली नसल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते लोकसेविका सोनाली आवटी यांचा तक्रारदार यांना कामा संदर्भात निरोप आ◌ाल्यानंतर त्यांचेविरूध्द पुढील कार्यवाही करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार यांना लोकसेविका आवटी यांनी संपर्क केल्यास तात्काळ आम्हास संपर्क करणेच्या तसेच झाले कार्यवाहीबाबत गोपनीयता राखणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे निघून गेले.

त्यानंतर आम्ही दि.02.09.2026 रोजीची पडताळणी कारवाई बाबतचा सविस्तर पंचानामा व स्क्रिप्ट त्याच दिवशी दोन्ही पंचासमक्ष एसीबी कार्यालय, सांगली येथे पुर्ण करण्यात आला. व दि. 02.09.2026 रोजी वापरण्यात आलेले मेमरीकार्ड दोन्ही पंचांसमक्ष सिलबंद करण्यात आले आहे. तसेच मी दोन्ही पंचांना संपर्क केलेनंतर हजर

राहणेच्या सुचना दिल्या.

दि. 19.09.2026 रोजी तक्रारदार श्री. मुल्ला यांनी आम्हास संपर्क हकीकत सांगितले की, "त्यांना दि. 19.09.2026 रोजी सुनिल पाटील यांना फोन केला असता त्यांनी सोमवार दि.21.09.2026 रोजी भुमी अभिलेख कार्यालय येथे भेटण्यास बोलविले असलेबाबत" सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना दि. 21.09.2026 रोजी पथकासह ईश्वरपूर येथे 11.00 वा पर्यंत येत असलेचे सुचना देवून सदर दिवशी हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी दोन्ही पंचांना संपर्क करून दि.21.09.2026 रोजी 10.00 वाजता एसीबी कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या.

दि.21.09.2026 रोजी आम्ही कार्यालयात हजर असता दोन्ही पंच 10.00 वाजता आमचे समक्ष हजर झाले. त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोह/सलिम मकानदार, पोना/चौगुले, चालक रजपूत असे पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे आवश्यक साहित्य सह शासकीय वाहन महिंद्रा बुलेरो न्युओ क्र. एमएच-10-ईव्ही-4685 मधून कार्यालयातून 10.00 वा चे सुमारास रवाना होवून स्टेशन चौक, सांगलीवाडी, आष्टा, ईश्वरपूर, पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग येथील नानासाहेब महाडीक कॉलेज जवळील हॉटेल मणिकंडण येथे 11.10 वा चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर मी तक्रारदार मुल्ला यांना संपर्क करून आम्ही थांबलो त्याठिकाणी बोलवून घेतले. तक्रारदार श्री. मुल्ला हे त्यांचेकडील होंडा शाईन क्र. एमएच-10-ईसी-6232 वरून आमचे समक्ष हजर झालेनंतर त्यांनी मी आमचेकडील वाहनात बसवले.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते तक्रारदार व पंच नं.1 महाडीक यांना लोकसेविका आवटी यांचेकडे पाठवून तक्रारदार यांचे प्रलंबित कामाचे चर्चेसाठी व लाच रक्कम देण्याची दिनांक व वेळ निश्चित करण्यासाठी त्यांची पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. मुल्ला व पंच क्र.1 महाडीक यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी 12.21 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंच नं.1 यांना पडताळणीकामी दिले सुचनांची उजळणी करून दिली.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 12.26 वा सुरु करुन तो तक्रारदार यांचे गळयामध्ये अडकवून त्यांना लोकसेविका श्रीमती सोनाली आवटी, परिरक्षण भुमापक यांची भुमी अभिलेख कार्यालय वाळवा ईश्वरपूर येथे भेट घेण्यास रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार मुल्ला व पंच नं.1 महाडीक होंडा शाईन क्र. एमएच-10-ईसी-6232 वरून रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. मुल्ला व पंच नं.1 महाडीक असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 12.59 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला.

त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. महाडीक यांना, लोकसेवक श्रीमती सोनाली आवटी यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, " आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून मध्यवर्ती प्रशासकीय इमारत ईश्वरपूर येथील दाखल झालो. त्यावेळी आम्ही मो.सा. पार्क करून 3 -या मजल्यवरील भुमी अभिलेख कार्यालय येथे जावून आवटी मॅडम व सुनिल पाटील यांची भेट घेतली. त्यावेळी तक्रारदार यांनी सुनिल पाटील यांना "साहेब मॅडम म्हणल्या ते" असे विचारले असता सुनिल पाटील यांनी "मी सांगितल की तुम्हाला त्यावेळी" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "मी आलतो त्यादिवशी घेवून... पण मॅडम म्हणल्या काम होऊद देत म्हणून थांबलो" असे म्हणाले. त्यावर सुनिल पाटील यांनी "फक्त घेतले न्हाईत" असे म्हणाले. त्यावर आवटी मॅडम यांनी "आधी देतो म्हणाले होते.. मी म्हणले होवूदेत...मॅडमला विचारल्या शिवाय" असे म्हणाल्या. त्यावर सुनिल पाटील यांनी "झाल की" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "मॅडमला भेटायच ना...आपल बोलण झालय" असे म्हणाले असता सुनिल पाटील यांनी "भेटायची काय गरज न्हाय" असे म्हणून भुमी उप अधीक्षक मॅडम यांची भेट घालून दिली नाही. त्यावेळी तक्रारदार यांनी "ते परवा मागितल्यात... कधी देवूदे सागा तुम्ही." असे विचारले असता सुनिल पाटील यांनी "आणल्यात?" असे म्हणून लागलीच पैशाची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी पैसे घरी असल्याचे सांगून कोणाकड द्यायच असे विचारले असता आवटी मॅडम यांनी ""घेवून या..बघुया" असे म्हणाल्या. त्यावर तक्रारदार यांनी "हितच घेवून येवू" असे विचारले असता आवटी मॅडम यांनी "न्हाय फोन करा...निघायच्या टायमाला... बघु सांगतो पाटील साहेबांना" असे म्हणाल्या. त्यावर तक्रारदार यांनी एक दिड तासात येतो असे म्हणून तक्रारदार व मी असे तेथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. मुल्ला यांना पडताळणीची हकीकत त्यांनी आवटी मॅडम यांनी घरून निघताना फोन

करण्यास सांगितले असल्याची हकीकत सांगितली.
त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. मुल्ला व लोकसेवक सुनिल पाटील व सोनाली आवटी यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 002 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाईमध्ये, लोकसेवक सुनिल पाटील व लोकसेविका सोनाली आवटी यांनी तक्रारदार यांना रक्कमेची जुळणी झाल्यानंतर घरातून निघताना फोन करण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते लोकसेवक सुनिल पाटील व लोकसेविका सोनाली आवटी यांचेविरूध्द सापळा कारवाई करण्याचे निश्तिच केले.

त्यानंतर मी, तक्रारदार व दोन्ही पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामधील पडताळणी कारवाई वेळचे मेमरीकार्ड काढून माझे ताबेत घेवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले.
त्यानंतर मी 14.46 वाजता सापळा कारवाईचे माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये व सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले आहे.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे मोबाईलवरून लोकसेविका आवटी यांचे मोबाईलवर फोन करून पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर आम्ही दिले सुचनेवरून तक्रारदार यांनी त्यांचे मो.क्र. 9049294388 वरून सोनाली आवटी यांचे मो.क्र. 8805698907 वर 14.56 वा कॉल करून फोन स्पिकर मोडवर घेतला. लागलीच आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 14.56 वा सुरू करून तक्रारदार यांचेसमोर धरला. त्यावेळी तक्रारदार यांनी "आवटी मॅडम नमस्ते....निघताना फोन करा म्हणला होता...निघालो होतो" असे म्हणाले. त्यावर आवटी मॅडम यांनी "एक पाच मिनीट थांबा" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "बर ठिक आहे" असे म्हणून फोन कट केला. लागलीच आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला. डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. मुल्ला व सोनाली आवटी यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 002 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची आम्ही खात्री केली.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते लोकसेविका आवटी यांचा तक्रारदार यांना फोन आलेनंतर त्यांचेविरूध्द सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले. त्यानंतर आम्ही बराच वेळ लोकसेविका आवटी यांचा फोन येण्याची वाट पाहिली. परंतू त्यांचा तक्रारदार यांना फोन न आल्याने तक्रारदार यांना पुन्हा आवटी यांना फोन करण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे मो.क्र. 9049294388 वरून सोनाली आवटी यांचे मो.क्र. 8805698907 वर फोन केला असता त्यांनी तक्रारदार यांचा फोन उचलला नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलवरून सोनाली आवटी यांच्या व्हॉट्सअप नंबरवरती 16.16 वा मेसेज पाठविला त्यावेळी 16.25 वा "उद्या या, मिटींग आहे" असा मेसेज आल्याने आम्ही सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करण्याचे निश्चित करून दि.22.09.2026 रोजी लोकसेविका सोनाली आवटी व सुनिल पाटील यांचेविरूध्द सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना दि.22.09.2026 रोजी पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग येथील नानासाहेब महाडीक कॉलेज जवळील हॉटेल मणिकंडण येथे 11.00 वाजता हजर राहणेच्या तसेच झाले कारवाईबाबत गोपनीयता राखणेच्या सुचना देवून जाणेस सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार हे निघून गेले.
त्यानंतर आम्ही दि.21.09.2026 रोजीची पडताळणी कारवाई बाबतचा सविस्तर पंचानामा, स्क्रिप्ट त्याच दिवशी दोन्ही पंचासमक्ष एसीबी कार्यालय, सांगली येथे पुर्ण करण्यात आला. तसेच मी दोन्ही पंचांना दि.22.09.2026 रोजी सकाळी 09.30 वाजता एसीबी कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या.

दि.22.09.2026 रोजी आम्ही दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच 09.30 वाजता एसीबी कार्यालयात आमचे समक्ष हजर झाले.

त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोह/सलिम मकानदार, पोना/चौगुले, चालक रजपूत असे पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे आवश्यक साहित्य सह शासकीय वाहन महिंद्रा बुलेरो न्युओ क्र. एमएच-10-ईव्ही-4685 मधून व पोह/मनोज निळकंठ, पोकॉ/पाटील व पोकॉ/चंद्रकांत जाधव असे खाजगी स्विफ्ट डिझायर कार क्र.एमएच-10-डीक्यु-0979 मधून कार्यालयातून 09.30 वा चे सुमारास रवाना होवून स्टेशन चौक, सांगलीवाडी, आष्टा, ईश्वरपूर, पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग येथील नानासाहेब महाडीक कॉलेज जवळील हॉटेल मणिकंडन येथे 10.45 वा चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर मी तक्रारदार मुल्ला यांना संपर्क करून आम्ही थांबलो त्याठिकाणी बोलवून घेतले. तक्रारदार श्री. मुल्ला हे त्यांचेकडील होंडा शाईन क्र. एमएच-10-ईसी-6232 वरून आमचे समक्ष हजर झालेनंतर त्यांनी मी आमचेकडील वाहनात बसवले.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते लोकसेविका सोनाली आवटी व सुनिल पाटील यांचेविरूध्द सापळा कारवाई करण्याचे

निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. मुल्ला यांना लाच रक्कम हजर करण्यास सांगितले असता तक्रारदार यांनी 10,000/- रूपये त्यामध्ये 500/- रूपये दराच्या 20 नोटा दोन्ही पंचांसमक्ष हजर केल्या. त्यावेळी आम्ही उर्वरित 40,000/- रूपये कार्यालयाकडील डमी नोटा वापरण्याचे निश्चित करून 500/- रूपये दराच्या 80 डमी नोटा असे 40,000 /- रूपये दोन्ही पंचांसमक्ष हजर केले.

त्यानंतर मी सापळा पथकातील अंमलदार यांचेकरवी तक्रारदार यांनी हजर केलेली 10,000/- रूपये रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतले. त्यावर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या.

त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर मी तक्रारदार यांनी हजर केलेल्या व कार्यालयाकडील डमी नोटांना व वर्तमान पत्रास पथकातील अंमलदार पोकॉ/चंद्रकांत जाधव यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर 50,000/- रूपये नोटांचा बंडल त्या वर्तमान पेपरमध्ये गुंडाळून पोकॉ/जाधव यांनी तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये लोकसेविका सोनाली आवटी व सुनिल पाटील यांनी मागणी केल्यानंतर त्यांना देणेसाठी ठेवली व आम्ही सापळापुर्व कारवाई पुर्ण केली.

त्यानंतर मी, तक्रारदार व दोन्ही पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून दि.21.09.2026 रोजीचे सापळा पुर्व कारवाई सिलबंद केले मेमरीकार्डचा लखोटा फोडून त्यामधील मेमरीकार्ड रेकॉर्डरमध्ये घातले. मेमरीकार्डमध्ये आरईसी 001 व 002 हया फाईल सेव्ह असल्याच्या पंचांना खात्री करून दिली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. मुल्ला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच पथकातील अंमलदार चंद्रकांत जाधव यांना मणीकंडन हॉटेल येथे थांबणेचे सुचना देवून त्यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले. तसेच मी पथकातील अंमलदार पोना/चौगुले यांना त्यांचेकडील हॅन्डीकॅममध्ये लोकसेविका सोनाली आवटी व सुनिल पाटील यांचेकडून लाच रक्कम जप्तीबाबत व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबतच्या सुचना दिल्या.

तसेच मी तक्रारदार यांना लोकसेविका सोनाली आवटी व सुनिल पाटील यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबतच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 12.02 वाजता सुरू करून तो तक्रारदार यांना त्यांचे गळयामध्ये अडकवून त्यांना लोकसेविका सोनाली आवटी व सुनिल पाटील यांची भेट घेण्याकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. मुल्ला व पंच नं. 1 श्री. महाडीक असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना झाले. त्यांचे पाठोपाठ मी, पंच नं. 2 पाटील व सापळा पथक असे आवश्यकत्या साहित्यासह शासकीय वाहन महिंद्रा बुलेरो न्युओ मधून व खाजगी वाहन स्विफ्ट डिझायर मधून रवाना झालो. पोकॉ/जाधव हे हॉटेल मणीकंडन येथे सुटकेससह थांबून राहिले.

त्यानंतर तक्रारदार व पंच नं.1 असे पेठनाका मार्गे ईश्वरपूर गावातून प्रशासकीय इमारत येथील कार्यालयाचे पार्किंगमध्ये दाखल झाले. त्यांचे पाठोपाठ आम्ही व सापळा पथक असे आमचेकडील वाहनाने तक्रारदार यांचे पासून काही अंतरावर वाहने पार्क केलीत. त्यानंतर तक्रारदार व पंच नं.1 असे प्रशासकीय इमारतीमध्ये जावून तिस-या मजल्यावरील भुमी अभिलेख कार्यालयात चालत गेलेचे दिसले. लागलीच आम्ही, पंच नं.2 पाटील व सापळा पथक असे आमचेकडील वाहनातून उतरून प्रशासकीय इमारतीमधील 3 -या मजल्यावरील भुमी अभिलेख कार्यालयाचे आजु-बाजूस व जिन्यावर सापळा लावून थांबून राहिलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांनी कार्यालयाचे बाहेर येवून हातरुमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला.

लागलीच मी, पंच नं.2 व सापळा पथक असे तक्रारदार यांचेजवळ गेलो. त्यावेळी मी दिले सुचनेप्रमाणे पोकॉ/पाटील यांनी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.05 वा काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेतला. पंच नं.1 महाडीक यांना लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी शिरस्तेदार खटावकर असे भिंतीवर बोर्ड असलेल्या रूममधील टेबलचे ड्राव्हरमध्ये सुनिल पाटील यांनी तक्रारदार यांना सोनाली आवटी यांचे समक्ष लाच रक्कम ठेवण्यास सांगितली. ती आवटी मॅडम यांच्या समक्ष टेबलचे ड्राव्हरमध्ये ठेवली असल्याची हकीकत सांगितली. तसेच तक्रारदार यांना लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता सुनिल पाटील यांचे सांगणेवरून लाचेची रक्कम शिरस्तेदार खटावकर असे लिहिलेल्या रूममधील टेबलच्या ड्राव्हरमध्ये ठेवली असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे सापळा पथकाने लोकसेविका सोनाली आवटी व सुनिल पाटील यांना ताबेत घेतले. त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पोना/प्रितम चौगुले यांनी त्यांचेजवळील हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ शुटींग सुरु केले.

त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे शिरस्तेदार खटावकर असे भिंतीवर बोर्ड असलेल्या रूममधील टेबलचे ड्राव्हरची तपासणी केली असता त्यामध्ये लाच रक्कम मिळून आली नाही. त्यानंतर आम्ही कार्यालयाचे सर्व रूमची तपासणी केली. त्यामध्ये लाच रक्कम मिळून आली नाही. त्यानंतर कार्यालयाचे पुरुष टॉयलेटमध्ये पंचंाकरवी तपासणी केली असता टॉयलेटच्या खिडकीमध्ये पेपरमध्ये गंुडाळून ठेवलेला लाच रक्कमेचा बंडल मिळून आला. त्यानंतर आम्ही दिले सुचनेप्रमाणे पंच नं.2 पाटील यांनी सदरची लाच रक्कम ताबेत घेवून सदर नोटांचे नंबरची तपासणी केली असता सदर नोटांचे क्रमांक हे तक्रारदार यांनी सापळा कारवाईवेळी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाचेच असलेचे निष्पन्न झाले. सदर लाचेची रक्कम पंच नं 2 पाटील यांना त्यांचेकडे ठेवण्यास सांगीतली त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडे ठेवली.

त्यानंतर कार्यालयाचे पोर्चमध्येे जरूर तो अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात लोकसेवक सुनिल पाटील व सोनाली आवटी यांचे हाताची तपासणी केली असता, लोकसेवक सुनिल पाटील त्यांचे दोन्ही हातास ठिक-ठिकाणी अॅथ्रॉसिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. सदर कार्यवाहीचे पोना/चौगुले यांनी सलग त्यांचेकडील सोनी हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ चित्रीकरण केले आहे. त्यानंतर लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या भुमी अभिलेख कार्यालय वाळवा येथे पुर्ण केल्या आहेत.

त्यानंतर मी लोकसेविका आवटी यांना त्यांचे पूर्ण नांव, वय, हुद्दा, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्रीमती सोनाली सचिन आवटी, वय - 46 वर्षे, व्यवसाय - नोकरी, परिरक्षण भुमापक, भुमी अभिलेख कार्यालय वाळवा, वर्ग-3, रा. सावर्डे गल्ली आष्टा, ता.वाळवा जि.सांगली असे असल्याचे सांगितले.
त्यानंतर मी लोकसेवक पाटील यांना त्यांचे पूर्ण नांव, वय, हुद्दा, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री.सुनिल गणपती पाटील, वय-48 वर्षे, व्यवसाय - नोकरी, मुख्यालय सहाय्यक, भुमी अभिलेख कार्यालय वाळवा वर्ग-3, मु. पो. पोकळे फाटा कोडोली ता.पन्हाळा जि.कोल्हापूर असे असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही भुमी अभिलेख कार्यालयामधून तक्रारदार यांचे कामा संदर्भातील अर्ज व कागदपत्रे व आवक रजिष्टर ताबेत घेतलीत.

त्यानंतर आम्ही लोकसेविका सोनाली आवटी व सुनिल पाटील यांना ताबेत घेवून भुमी अभिलेख कार्यालय वाळवा येथून रवाना होवून ईश्वरपूर पोलीस  येथे दाखल झालो.

त्यानंतर मी पंच नं. 1 श्री. महाडीक यांना सापळ्याची सविस्तर हकीकत सांगण्यास सांगितली असता पंच नं. 1 यांनी सापळ्याची हकीकत सांगितली की, " मी व तक्रारदार असे त्यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून मध्यवर्ती प्रशासकीय इमारत येथे दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार व मी असे 3 -या मजल्यावरील भुमी अभिलेख कार्यालयामध्ये गेलो. त्यावेळी तक्रारदार यांनी कार्यालयामधील कर्मचारी यांना आवटी मॅडम व सुनिल पाटील यांचेबाबत विचारणा केली असता ते मॅडम यांचे केबीनमध्ये असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही थोडा वेळ तेथे थांबून राहिलो. काही वेळाने सुनिल पाटील यांनी हाताने इशारा करून तक्रारदार मुल्ला यांना बोलावून घेतले. त्यावेळी तक्रारदार यांनी "बोला सर" असे म्हणाले. त्यावर सुनिल पाटील यांनी "सांगतो तुम्हाला कुठ ठेवायच.. तिथ ठिवुन जावा मग...थांबा थोडा वेळ" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व मी असे काही वेळ कार्यालयाचे पोर्चमध्ये थांबून राहिलो. काही वेळाने सुनिल पाटील यांनी तक्रारदार यांना बोलावून "तेच कि.... म्हणजे झालय का व्यवस्थीत जुळणा.." असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांना झालय असे म्हणाले. त्यावेळी सुनिल पाटील यांनी आवटी मॅडम यांना बोलावून कार्यालयातील शिरस्तेदार खटावकर यांचे रूममध्ये बोलावून घेतले.

त्यावेळी सुनिल पाटील यांनी आवटी मॅडम यांना "त्यांच कधी होणार सही कधी घेणार हायसा" असे विचारले असता आवटी मॅडम यांनी "लाईट आली तर मग आज सही हुन जात्या काय आडचण न्हाय... न्हाय तर मग उद्या पर्यत हुन जाईल त्यांच" असे म्हणाल्या. त्यावर सुनिल पाटील यांनी तक्रारदार यांना "तुम्हाला उद्या आदेश द्यायची व्यवस्था करतो" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी सुनिल पाटील यांना "चालतय चालतय.... कुठ हे करायच मग सांगा" असे विचारले असता सुनिल पाटील यांनी "द्या त्यांच्याकड आता... कशाला माझ्याकड... द्या त्यांच्याकडच" असे म्हणून रक्कम आवटी मॅडम यांचेकडे देण्यास सांगितली. त्यावर आवटी मॅडम यांनी "तुम्ही हातान तुमच्या ठेवुन जावा कि" असे म्हणाल्या. त्यावर सुनिल पाटील यांनी "ठेवा हिथ... ड्रॉव्हर मध्ये ठेवा" असे म्हणून तक्रारदार यांना टेबलच्या ड्राव्हरमध्ये लाच रक्कम ठेवण्यास सांगितली. त्यावेळी तक्रारदार यांनी लाच रक्कम टेबलच्या ड्राव्हरमध्ये ठेवून "मोजणार न्हाय का" असे विचारले असता सुनिल पाटील यांनी रक्कम मोजण्यास नकार दिला. त्यावेळी तक्रारदार यांनी "थॅंक्यु सर ....... तुम्ही सांगीतलेले पन्नास हजार रूपये" असे म्हणाले असता सुनिल पाटील यांनी "ह" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी कार्यालयाचे बाहेर येवून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला." वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. मुल्ला यांना सापळा कारवाईची हकीकत विचारली असता त्यांनी "लोकसेविका सोनाली

आवटी व सुनिल पाटील यांनी लाच रक्कम स्विकारताना पंच नं.1 महाडीक हे समक्ष हजर होते व त्यांनी सर्व ऐकले व पाहिले आहे अशी हकीकत सांगितली. त्यानंतर पुढील कार्यवाही ईश्वरपूर पोलीस ठाणे येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. 19/08/2026, दि. 02/09/2026 व दि. 21/09/2026 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक सुनिल पाटील यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांचे वडीलांचे नांवे करंजवडे, ता. वाळवा येथे असले सिटी सव्हे नंबर 515 वरील क्षेत्राची मोजणी करुन क्षेत्र दुरुस्ती करण्याचे काम कार्यालय प्रमुख यांच्याकडून पुर्ण करुन देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे 1,00,000/- रुपये लाचेची मागणी केली व लोकसेविका सोनाली आवटी यांनी तक्रारदार यांचे नमुद काम कार्यालय प्रमुख यांचेकडे सादर करुन मंजूर करुन घेण्यासाठी चर्चेअंती तक्रारदार यांचेकडे 50,000/- रुपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.22/09/2026 रोजीचे केले सापळा कारवाईमध्ये, लोकसेवक सुनिल पाटील व लोकसेविका सोनाली आवटी यांनी स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता भुमी अभिलेख कार्यालय वाळवा येथे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून, लोकसेवक सुनिल पाटील यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम 50,000/- रूपये सोनाली आवटी यांचे समक्ष स्विकारून दोघांनी स्वत:चा आर्थिक फायदा मिळविला आहे. म्हणुन माझी लोकसेविका 1) श्रीमती सोनाली सचिन आवटी, वय - 46 वर्षे, व्यवसाय - नोकरी, परिरक्षण भुमापक, भुमी अभिलेख कार्यालय वाळवा, वर्ग-3, रा. सावर्डे गल्ली आष्टा, ता.वाळवा जि.सांगली व लोकसेवक 2) श्री.सुनिल गणपती पाटील, वय-48 वर्षे, व्यवसाय - नोकरी, मुख्यालय सहाय्यक, भुमी अभिलेख कार्यालय वाळवा वर्ग-3, मु. पो. पोकळे फाटा कोडोली ता.पन्हाळा जि.कोल्हापूर यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 (सुधारणा 2018) चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो पिं्रट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष                                        हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
HARISHCHANDRA HUNUMANT GAVADE
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):** 15101000402HH
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**:**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

श्रीमती यास्मीन शरीफ इनामदार
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
सांगली.

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANDIP VITTHAL PA

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 15101000402svpm840